


# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन आणि दृष्टिकोन

संपादक: प्रा. सोमनाथ गुंजकर
डॉ. शिवसांब कापसे

Scanned by CamScanner

ISBN : 978-93-82995-31-9

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन आणि दृष्टिकोन**
Dr. Babasaheb Ambedkar Vichardhan Aani Drashtikon

**संपादक**
प्रा. सोमनाथ गुंजकर
प्रा. डॉ. शिवसांब कापसे

**सर्व हक्क**
© संपादक

**प्रकाशक :**
अनुराधा प्रकाशन, नांदेड

**प्रथम आवृत्ती**
एप्रिल २०१७


**मुखपृष्ठ**
संतोष घोंगडे

**अक्षरजुळणी व सजावट**
अक्षरवेध बुक क्रिएशन
आनंदनगर, नांदेड.

**मुद्रक**
रूद्रायणी ऑफसेट,
औरंगाबाद.

**किंमत : २००/-**

(सदरील संपादित ग्रंथात व्यक्त झालेल्या विचाराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)



**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.....**

Scanned by CamScanner

| अ.क्र. | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३७) | **हिंदू कोड बिलाची निर्मितीप्रक्रिया - एक अध्ययन**<br>मगरे उषाताई लक्ष्मण | २२३ |
| ३८) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण**<br>मनिषा काशिनाथाव पाटील | २२९ |
| ३९) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सांसदीय लोकशाही**<br>प्रा. प्रविण स्वामी | २३४ |
| ४०) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टिकोन**<br>प्रा. कविता किशोर कोत्तावार | २३९ |
| ४१) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचारधन**<br>प्रा. परमेश्वर भुस्से | २४६ |
| ४२) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जागतिक व्यवस्थापन विचार एक अभ्यास**<br>प्रा. कु. जमधाडे स्मिता ज्ञानेश्वर | २४९ |
| ४३) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार**<br>प्रा. सोनटक्के शशिकांत | २५४ |
| ४४) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटनेतील मूलभूत तत्त्वे**<br>सचिन गुंडीराम डेंगळे | २५७ |
| ४५) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार आणि आजची शैक्षणिक स्थिती**<br>प्रा. प्रमोद आर. तायडे | २६३ |
| ४६) | **बहिष्कृत भारत मधील निवडक अग्रलेखांचा अभ्यास**<br>(विशेष संदर्भ - सप्टेंबर १९२७ ते डिसेंबर १९२८)<br>प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले | २६७ |




Scanned by CamScanner

किंवा अधिकार भारतीय राज्यघटनेने प्रत्येक भारतीय नागरिकाला दिले आहेत. प्रत्येक व्यक्तीला जसे हक्क असतात, तशीच कर्तव्येही असतात. हक्क व कर्तव्ये एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत, याचे भान प्रत्येक नागरिकाला असावयास हवे. शासन कोणत्याही राजकीय पक्षाचे असले, तरी धोरणे ठरविताना आणि कायदे करताना ही मार्गदर्शक तत्त्वे पाळायची असतात.

**संदर्भ ग्रंथः**


1. Dr. B. R. Ambedkar (Architecture), The Constitution of India, Sandarbha Prakashan, Aurangabad, P. 6-19.
2. Introduction to Constitute of India, Ministry of Law and Justice of India, 29th July 2008.
3. Das, Hari (2002), Political System of India, Anmol Publications, P. 120 ISBN- 8174886907
4. Pylee M. V. (1977), India Constitution, S. Chand & Co. ISBN-812190403x
5. शिल्पकार : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताचे संविधान (99 व्या घटनादुरूस्तीसह सुधारित आवृत्ती-2016), संदर्भ प्रकाशन, औरंगाबाद-411005.


▲▲▲



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार आणि आजची शैक्षणिक स्थिती


**प्रा.प्रमोद आर . तायडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री. व.ना. कला व श्री. अ. ना. वाणिज्य
महाविद्यालय मंगरूळपीर जि. वाशिम


**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चिंतनाचा विषय कोणताही असो त्यांची प्रेरणा ही मानव मात्राविषयी व त्यातही दीनदलितांविषयी त्यांना असणाऱ्या असीम कळवळयाची होती. मग तो विचार राष्ट्रवादाचा असो लोकशाहीचा असो राजकीय असो. समाजवादाचा असो की, सामाजिक न्यायाचा आणि शैक्षणिक विचारांचा असो हरहुन्नरी प्रशासक, वस्तुनिष्ठ अभ्यासक, प्रज्ञावंत विधिज्ञ व जबाबदार लोकप्रतिनीधी अशा अनेक भूमिका आंबेडकरांनी पार पाडल्या पण प्रत्येक भूमिकेवर त्यांच्या मानवतावादी विचारसरणीची छाप पडलेली दिसते.

डॉ. बाबासाहेबांचे नाते मानवी विश्वाशी आहे. मानव आणि समाज यांच्यातील संबंधाशी आहे. त्यांच्या चिंतनाचा केंद्रबिंदू मानवच आहे. ईश्वरादी गोष्टी नाहीत. या देशाच्या कोटयावधी जनतेच्या अंत:करणांना हेलावून सोडण्याचे सामर्थ्य आंबेडकरांच्या वाणीला व लेखनीला प्राप्त झाले.

शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि प्राशन केल्याने माणूस डरकाळी फोडल्या शिवाय राहणार नाही. असे शिक्षणाला लोकजागृतीचे शस्त्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानत होते. म्हणून त्यांनी आपल्या जीवनात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व दिले होते. स्वत: उच्च शिक्षित होऊन एक आदर्श समाजापुढे ठेवला होता. नागपूर येथे अखिलभारतीय दलित परिषदेच्या अधिवेशन प्रसंगी जीवनाचे पाच सुत्र त्यांनी सांगितले ते म्हणाले की, शिक्षित व्हा चळवळ करा. संघटित व्हा, आत्मविश्वास बाळगा, कधीही धीर सोडू नका. समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण हे आवश्यक आहे. याचा आग्रह डॉ. आंबेडकरांनी सतत धरला होता भारतीय लोकशाहीची स्थापना करतांना, संविधान निर्माण करताना शिक्षण हा मुलभूत अधिकार भारतीय लोकांना प्रदान करण्यात आलेला

आहे.

डॉ. आंबेडकरांनी माणसाच्या विकासासाठी शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करतांना आज शिक्षणाची जी स्थिती आहे. ती निराशाजनक आहे. याचा एक शोध या निबंधाच्या निमित्ताने घ्यायचा आहे.

**१) प्राचीन भारत आणि शिक्षणाची स्थिती -**

वैदिक कालखंडामध्ये शिक्षणाचा अधिकार शुद्र आणि स्त्रियांना नाकारला होता. शिक्षणाची मक्तेदारी एका विशिष्ट वर्गाकडेच केंद्रित झाली होती. त्यामुळे बहुसंख्य समाज कर्मकांडात गुरफटला आणि त्याचा विकास खुंटला मनुस्मृती सारख्या धर्मग्रथांनी तर शुद्रांच्या आशा आकांक्षाचे पंखच कापून टाकले. अध्ययन व अध्यापन करणे हा गुन्हा असुन जर शुद्राने शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला तर त्याच्या काणात शिसे ओतण्याचा दंड त्याला ठोठावण्यात येत असे. एकुणच प्राचीन भारतात बहुजन समाजाला शिक्षणाची संधी नकारण्यात आली होती.

**२) डॉ. आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार -**

डॉ. आंबेडकरांचे शिक्षणावर अतिशय प्रेम होते. शिक्षणाचे महत्त्व विशद करतांना ते म्हणतात, "हिंदू" समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्त्व आहे हे मी जाणतो खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते. पण ही मोठी चूक आहे. दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न वस्त्र व निवाऱ्याची सोय करून पुर्वीप्रमाणेच त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे खालच्या वर्गाची ज्यांच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे तो न्युनगंड त्यांच्या पासून नाहीसा कारणे, उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे. (जनता २२ सप्टे. १९५१)

डॉ. आंबेडकरांच्या आतापर्यत पाहिलेल्या शिक्षण विचारावरून आणि जीवनचरित्रावरून त्यांच्या शिक्षणविचाराची काही वैशिष्टये लक्षात येतात ती पुढीलप्रमाणे.

१) मुक्त करते ते शिक्षण, शिक्षणातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, या मूल्यांची जोपासना व्हावी.

२) शिक्षणामुळे सामाजिक संघटन निर्माण व्हावे.

३) शिक्षणामुळे सामाजिक न्याय मिळायला हवा. कुणीही मागासलेला राहु नये.



४) लोकशाही यशस्वीतेसाठी राजकीय शिक्षण घेणे महत्त्वाचे

५) आत्मभानाची म्हणजे अस्तित्वाची ओळख व जाणीव शिक्षणातून व्हावी

६) समाज परिवर्तनाचे साधन शिक्षण असावे.

७) उच्च शिक्षण सर्वांना घेता यावे, उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज मागासवर्गीय न्युनगंड नाहीसा होणार नाही.

८) विद्यापीठीय विधी मंडळात मागासवर्गीयांना प्रतिनिधित्व आवश्यक आहे. त्याशिवाय मागासवर्गीयांचे प्रश्न मार्गी लागणार नाही.

९) अस्पृश्यांच्या व मागासवर्गीयांच्या शिक्षणाचा स्वतंत्र विचार होणे आवश्यक

१०) उच्च शिक्षण, सामाजिक समानता, व सामाजिक न्यायाच्या दृष्टिने आवश्यक आहे. स्त्रीही व्यक्ती आहे, लिंगभेदानुसार प्रगती आणि विकासाला अडसर नको. स्त्रीलासामजिक हक्क शिक्षणामुळे मिळेल ही अपेक्षा

११) स्त्री-पुरूष समानता तत्त्व रूजविण्याकरीता सहशिक्षण आवश्यक आहे.

१२) अध्यापक स्वतःच्या व्यवसायाशी निष्ठा बाळगणारा ज्ञाननिष्ठ आणि स्वतंत्र विचार करणारा असावा.

१३) शिक्षणाचे माध्यम देशी भाषाच असावी.

१४) ग्रंथालय आणि प्रयोगशाळा विद्यापीठाचे दोन डोळे आहेत.

१५) मागासवर्गीयांना निर्भयपणे शिक्षण घेता यावे म्हणून त्यांना शिक्षण सवलती आवश्यक.

१६) शिक्षणाची जबाबदारी खाजगी शिक्षण संस्थावर न टाकता ती प्रत्यक्ष सरकारने उचलावी

१७) तरूणांनी स्वतःवर अवलंबून राहावे स्वतःचे कष्टावर जगावे, स्वतःच्या बुध्दीवर विश्वास ठेवून तीचा उपयोग करावा विवेक बुध्दीला शरण जावे. ज्ञानापेक्षा पुजनीय असे काही एक नाही. आपल्या भाग्याचे ते स्वतःच शिल्पकार आहेत. कोणीही माणुस जन्मंताच मंदमतीचा नसतो.

१८) विद्यापीठाचा कारभार सुव्यवस्थित चालविण्या करीता कार्यकारी मंडळाची रचना करावी. याप्रमाणे सर्व स्तरावरून अभ्यास आणि निरिक्षणे करून डॉ. आंबेडकरांनी शिक्षणविषयक विचार मांडले व अंमलात आणले.

**३) आधुनिक भारत आणि आजची शिक्षणाची स्थिती -**

आधुनिक भारतातही शिक्षणाची स्थिती फारशी आशादायक नाही. महापुरूषांनी



Scanned by CamScanner

बहुजनांच्या उत्थानाचे शिक्षण हे शस्त्र आहे. असे म्हटले असले तरी राज्य आणि राष्ट्राचे धोरण ठरवतांना त्यांची पायमल्ली करण्यात आली आहे. ६०% पेक्षा जास्त बहुजन समाज अजूनही अशिक्षित आहे. त्यात आदिवासी, मुस्लिम आणि स्त्रिया यांचे प्रमाण सर्वाधिकआहे. भारतीय संविधानाने शिक्षणाची समान संधी दिली असली तरी राज्यकर्त्यांनी त्याची अंमलबजावणी केली नसल्याचे आजच्या परिस्थितीतून लक्षात येते.

**निष्कर्ष :-**

डॉ. आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचार आणि आजची शैक्षणिक परिस्थिती यांचा विचार करीत असतांना बहुजनांना शिक्षणाची संधी मिळाली. परंतु नव्या अर्थनितीने ती नाकारल्या जात आहे. यावरून पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढता येईल.

१) वैदिक कालखंडात ब्राम्हणशाहीने बहुजनांना शिक्षणाचा अधिकार नाकारला.

२) म. फुल्यांनी बहुजनांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देऊन शैक्षणिक क्रांती केली.

३) आधुनिक कालखंडात राज्यकर्ते व नवे आर्थिक धारेण बहुजनांच्या शैक्षणिक अधोगतीला कारणीभूत आहे.

४) डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाला समाजविकासाचे साधन मानले व भारतीय संविधानाच्या माध्यमातून मनुस्मृतीने नाकारलेला शैक्षणिक अधिकार बहुजनांना प्रदान केला

५) आजची शैक्षणिक परिस्थिती डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांना मारक आहे.

**संदर्भ ग्रंथं :-**


१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग -२

२) म. फुले समग्र वाङ्मय

३) कंगालाचे अर्थशास्त्र, हेमंत देसाई

४) मनुस्मृतीच्या समर्थक ंची संस्कृती, डॉ. आ. ह. साळुंखे

५) महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर - क्रांती महाजन


▲▲▲




Scanned by CamScanner

# भारतीय लोकशाहीतील
# भ्रष्टाचार

(Corruption in Indian Deomocracy)

डॉ. मंगला साबद्रा | डॉ. शुभांगी राठी



अथर्व पब्लिकेशन्स

Scanned by CamScanner

अथर्व पब्लिकेशन्स्

भारतीय लोकशाहीतील भ्रष्टाचार
Corruption in Indian Democracy

© सुरक्षित

ISBN - 978-93-82795-86-5

प्रकाशक
युवराज भटू माळी
अथर्व पब्लिकेशन्स्
: धुळे :
१७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे - ४२४००१
भ्रमणध्वनी : ९४०५२०६२३०
: जळगाव :
तळमजला, ओम हॉस्पिटल
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी,
जळगाव ४२५ ००१
फोन : ०२५७-२२३९६६६, भ्रमणध्वनी : ९७६४६९४७९७
Web : www.atharvapublications.com
Email : info@atharvapublications.com,
atharvapublications@gmail.com

प्रथमावृत्ती : ४ जानेवारी २०१४

अक्षरजुळवणी
सौ.हर्षाली अ. भंगाळे
मो.९९२२९२४६८५

मूल्य : ₹ ५००/-

- BCUD sponsered one day National Conference organised by Smt. P.K.Kotecha Mahila Mahavidyalaya, Bhusawal On Corruption in Indian Democracy and selected research papers are published in this book.
- The Editor the Board of Editiors and Publisher may or may not agree with the thoughts of the authors published in this book. It is the sole responsibility of the writer in case of authenticity of their paper.



# Message

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
**NORTH MAHARASHTRA UNIVERSITY,**
Umavinagar, P.B.No.80, Jalgaon - 425001, (M.S.) INDIA

***Prof. Sudhir U. Meshram***
*M.Sc., Ph.D., IARI, New Delhi, Post-Doctorate (IAC), Holland*
*Vice-Chancellor*

☎: (O)+91- 257 - 2258401, 2258402
(R) +91- 257 - 2258404
Fax (O) : +91- 257 - 2258403
(R) : +91- 257 - 2258003
E-mail : vco@nmu.ac.in
rgvbc_sum123@rediffmail.com
Web : www.nmu.ac.in

I am happy to know that Smt.P.K.Kotecha Mahila Mahavidyala,Bhusawal is organizing National Conference on ***"Corruption in Indian Democracy"*** on 4th Jan.2014.

Corruption is one of the burning issues that damages moral and ethical values of the society. Taking into consideration the vital role of democracy in controlling corruption, it is the need of an hour to address the bottleneck issues related to the corruption in Indian democracy. I am sure that the deliberations in this conference will be fruitful in providing ways and means to abolish corruption and to find out the root causes that lies in the society. The main focus of the conference will be on imbibing the ethical values from the childhood, changing the attitude and mindset of every indivifual, to encourage people to fight against injustice etc.

I am sure that exchange of views will also take place effectively through interaction in this conference.

**I wish the National Conference a grand success.**

**(Prof.Sudhir U.Meshram)**
**Vice-Chancellor**

- Member Advisor to Steering Committee of Planning Commission, Govt. of India, New Delhi
- Expert Member to Standing Research Advisory Committee, Min. of SJ&E, Govt. of India, New Delhi
- Hon. Member of Maharashtra State Audit Advisory Board, Principal Accountant General (Audit), Mumbai as per comptroller & Auditor General of India



Scanned by CamScanner

21. भारतीय राजकारणातील भ्रष्टाचार एक वाळवी ........ ६८
– रमेश सवाईराम जाधव
21. भारतीय लोकशाहीतील भ्रष्टाचार ........ ७०
– प्रा.व्ही.जे. खरात
22 भारतीय राजकारणातील भ्रष्टाचार आणि लोकपाल विधेयकाची वाटचाल........ ७१
– डॉ.रामकिशन वसंतराव लोमटे
23. भ्रष्टाचार – भारताच्या आर्थिक विकासातील अडथळा........ ७५
– प्रा.डॉ.अलका मानकर
24. भ्रष्टाचार : भारतीय लोकशाहीसमोरील आव्हान........ ७८
– डॉ.प्रा.विलास आघाव, --प्रा.माधव कदम
25. भ्रष्टाचार : भारतीय लोकशाहीतील एक आव्हान ........ ८१
– प्रा.संजय काशिनाथ पाटील
26. सरकारी भ्रष्टाचार ........ ८४
– प्रा.डॉ.शोभा त्र्यंबक चौधरी
27. भ्रष्टाचाराचे लोकशाहीवरील परिणाम ........ ८७
– प्रा.डॉ.सौ.नंदीनी तडकलकर, --ओमकार गोपिनाथ चिंचोले
28. निवडणुकातील भ्रष्टाचार : कारणे आणि उपाय........ ८९
– प्रा.एस.यु. ढाले
29. भारतातील लोकशाहीतील भ्रष्टाचार........ ९१
– प्रा.अशोक अमृतराव पाटील
30. भारतीय लोकशहीतील भ्रष्टाचार एक ज्वलंत समस्या ........ ९४
– प्रा.बी.एल. बाविस्कर
31. भारतीय लोकशाहीतील भ्रष्टाचार ........ ९७
– प्रा.डॉ.एस.जी. भांगडिया
32. भ्रष्ट व्यवस्था : एक उग्र वास्तव ........ १००
– प्रा.जी.डी. घोडे
33. भारतीय लोकशाहीतील भ्रष्टाचार आणि राष्ट्रीय सुरक्षा........ १०३
– डॉ.व्ही.वाय. जाधव
34. भारतीय लोकशाही आणि भ्रष्टाचार........ १०६
– प्रा.गौतम कांबळे
35. प्रशासनातील भ्रष्टाचार कारणे आणि उपाययोजना ........ १०८
– प्रा.महेंद्र पाटील
36. प्रशासनातील भ्रष्टाचार........ १११
– डॉ.सुरेंद्र मोरे
37. भारतीय राजकारणातील भ्रष्टाचार : कारणे व उपाय ........ ११४
– प्रा.प्रमोद आर. तायडे
38. भारतीय लोकशाही आणि भ्रष्टाचार : एक विश्लेषणात्मक अध्ययन........ ११७
– प्रा.विलास एस. टाले



Scanned by CamScanner

# भारतीय राजकारणातील भ्रष्टाचार : कारणे व उपाय

– प्रा.प्रमोद आर.तायडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री व.ना.कला व श्री.अ.ना.वाणिज्य महाविद्यालय मंगरुळपीर, जि.वाशिम

**प्रास्ताविक :** भारतात भ्रष्टाचाराच्या समस्येने सार्वत्रिक रूप धारण केलेले आहे. सर्व सामान्य जनतेला त्याचा पदोपदी अनुभव येत आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात लोकशाही शासन व्यवस्था स्विकारली गेली. लोकांचे लोकांसाठी, लोकांच्याकडून चालवले जाणारे शासन अशी लोकशाहीची प्रतीमा निर्माण करण्यात या देशातील शासनाला गेल्या ६५ वर्षात अपयश आले. यास अनेक कारणे कारणीभूत आहेत. त्यातील एक महत्वाचे कारण म्हणजे भ्रष्टाचार होय. भ्रष्टाचारामूळे शासन व्यवस्थेबाबत लोकांचा भ्रमनिरास होत चालला आहे. राजकिय व प्रशासकिय क्षेत्रातील भ्रष्टाचाराने तर कळस गाठलेला आहे. दररोज भ्रष्टाचाराची नवनवीन प्रकरणे बाहेर पडत आहे. शासनाशी संबंधीत कोणतेही काम करून घ्यावयाचे असेल तर भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्या शिवाय ते पूर्ण होत नाही. हा अनूभव सार्वत्रिक बनत चालला आहे. जयप्रकाश नारायण, अण्णा हजारे यांच्या आंदोलनांना मिळालेला जनतेचा पाठींबाच लोकांच्या मनात या समस्येबाबत असलेला तिटकारा व्यक्त करतो.

ज्या प्रमाणे जीभेवर ठेवलेली साखर न खाणे तसेच पाण्यातील मासा पाण्यात राहतांना केंव्हा पाणी पितो त्यालाच समजत नाही. त्याप्रमाणे सार्वजनिक पैशांचा गैरवापर कर्मचारी, राजकारणी केंव्हा करतात हे समजत नाही. भ्रष्टाचाराबाबत संशोधन करणाऱ्या जर्मनीतील 'ट्रान्सफरन्सी इंटरनॅशनल' या संस्थेने कोणताही देश भ्रष्टाचारापासून मुक्त नाही असा निष्कर्ष काढला. या संशोधन संस्थेच्या १७६ देशाच्या पाहणीत या भ्रष्टाचारी देशाच्या यादीत भारताचा नववा क्रमांक आहे.

**भ्रष्टाचाराचा अर्थ व व्याख्या :** भ्रष्टाचार हा चार अक्षरी शब्द छोटा वाटत असला तरी त्याने निर्माण केलेल्या प्रश्नांची व्याप्ती फार मोठी आहे. भ्रष्टाचार या शब्दामध्येच त्यातील अर्थ दडलेला आहे. शब्दशः अर्थ लक्षात घेतांना असे म्हणता येईल की, 'भ्रष्ट असा आचार म्हणजे भ्रष्टाचार होय' पण भ्रष्टाचार नेमके कशाला म्हणायचे भ्रष्टाचारी कूणाला म्हणायचे भ्रष्टाचारी वर्तन म्हणजे नेकमे कोणते वर्तन हे ठरविनेच कठीण बनले आहे. कारण भ्रष्टाचार हा शब्द व्यवहारात वापरुन इतका गुळगुळीत झाला आहे की, त्याचा अर्थ स्पष्ट करतांना संदिग्धता अधिक जाणवते.

भ्रष्टाचारामध्ये सत्तेचा गैरवापर करणे, व्यक्तीची अडवणूक करणे, पैसा व इतर सेवा मिळविणे, शोषण करणे, नैतिक अधःपतन, लाचलुचपत, नियमबाह्य वर्तन इत्यादींचा समावेश होतो.भारतीय राज्य घटनेच्या कलम १६१ मध्ये भ्रष्टाचाराची व्याख्या करतांना असे म्हटले आहे की,

''जो शासकिय सेवक आहे किंवा होऊ इच्छितो त्याने आपल्या कायदेशीर वेतना शिवाय दूसऱ्या व्यक्तीकडून आपल्या कामाबद्दल मान सन्मानाची अपेक्षा बाळगणे बक्षिसे स्विकारणे, त्या मोबदल्यात संबंधीत व्यक्तींशी उपकारक किंवा अपकारक वर्तन करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''

जागतीक बँक १९९७ च्या अहवलात ''खाजगी कारणासाठी सार्वजनिक सत्तेचा केलेला गैरवापर म्हणजे भ्रष्टाचार होय''.

इलियट व मेरिल यांच्या मते, ''प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष व्यक्तीगत फायद्यासाठी निर्दिष्ट कर्तव्यात स्वच्छेने कसूर करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''

वरील व्याख्यांच्या आधारे भ्रष्टाचाराची सर्वसमावेशक व्याख्या अशी करता येईल की, ''भ्रष्टाचार म्हणजे स्वतः च्या फायदयासाठी केलेला सत्तेचा दुरुपयोग होय.''

**भारतीय राजकारणातील भ्रष्टाचार :** भ्रष्टाचाराच्या संकल्पनेचा, अत्यंत व्यापक स्तरावरुन ऐतिहासिक, सामाजिक, नैतिक आणि राजकिय संदर्भ घ्यानात घेऊन विचार करणे आवश्यक आहे. भारतात भ्रष्टाचाराची व्याप्ती व्यापक स्वरूपाची असून समाजातील सर्व क्षेत्रे भ्रष्टाचाराने पोखरुन निघाली आहेत. शासन आणि लोकप्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर भ्रष्टचाराचा अनुभव आपणास येत असतो देशातील निरनिराळ्या क्षेत्रात आजवर झालेल्या भ्रष्टाचाराची काही प्रकरणे नजरे समोर आणली तरी या संकटाने किती आक्राळ-विक्राळ स्वरूप धारण केले आहे याची कल्पना आपणास येऊ शकते. स्वातंत्र्यानंतरच्या ६५ वर्षाच्या काळात देशाने अनेक पंतप्रधान बघितले त्यांच्या पैकी पंडीत



Scanned by CamScanner

जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि नरसिंहराव हे चौघेजण पंतप्रधान पदाची पाच वर्षाची मुदत किमान एकदा तरी पूर्ण करु शकले पण नेमक्या त्याच सर्वांच्या राजवटीत देशातील भ्रष्टाचाराच्या वारकऱ्यांची यात्रा मैलाचा एक-एक दगड मोठ्या उत्साहाने पार करीत पुढे जात होती. पंडीत नेहरु हे अर्थातच आपल्याला लाभलेल्या पंतप्रधाना मध्ये सर्वात स्वच्छ आणि चारित्र्यवान पंतप्रधान होते. पण त्यांनी ज्या पद्धतीने आपल्या सहकारी मंत्र्यांच्या भ्रष्टाचारावर पांघरुन घालण्याचा केलेला प्रयत्न हा अत्यंत धक्कादायक होता. इंदिरा गांधी तर थेट मैदानातच उतरल्या आणि त्यांच्या कार्यपद्धतीमुळे समाज व्यवस्थेत भ्रष्टाचाराची सर्व स्तरांवर विधिवत प्रतिष्ठापणा झाली. राजीव गांधीनी या विषयात मोठी मजल मारली आणि खुद्द तेच भ्रष्टाचारात सहभागी असल्याचे आरोप झाल्याने पंतप्रधान पदाची कधीही भरुन निघणार नाही एवढी अप्रतिष्ठा झाली आणि नरसिंहराव यांना तर भ्रष्टाचाराच्या खटल्यात थेट आरोपीच्या पिंजऱ्यात जाऊन उभे राहावे लागले. पंतप्रधान पदाची पाच वर्षाची मुदत पूर्ण करणारा या पुढचा पंतप्रधान हा 'तिहार जेल' मधून आपला कारभार करीत नसेल. एवढीच आशा करणे आपल्या हाती उरले आहे.

एका राजकीय पुढाऱ्याने एकदा आपल्या हिशोबनिसास आपल्या साऱ्या संपत्तीची मोजदाद करण्यास सांगितले. बारीक सारीक हिशोब करून त्याने त्या नेत्याला मोठ्या उत्साहाने सांगितले की, आहे तेवढ्या पैशात तुमच्या पुढच्या किमान सात पिढ्या बसून खाऊ शकतील ! पण हे एकूण त्या पुढऱ्याने आपल्या आठव्या पिढीचे काय होईल, या चिंतेने तो पुढारी व्याकूळ झाला होता! थोडक्यात कितीही संपत्ती मिळाली तरी राजकारण्यांची भुक भागणे कठीणच असते ! चंगळवादी संस्कृतीच्या पूर्णपणे आहारी गेलेल्या नेत्यांबाबत काही बोलणे कठीण आहे. भारतातील भ्रष्ट राजकारण्यांची यादी इतकी मोठी आहे की, त्या सर्वांचा येथे नामोल्लेख करणे शक्य नाही. अनेक केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि राज्यस्तरावरील मंत्री भ्रष्टाचाराच्या शेकडो प्रकरणात सापडले आहेत. त्यापैकी कित्येकांना न्यायालयीन आणि अन्य चौकशी मध्ये दोषीही ठरविण्यात आले. त्यापैकी फारच थोडयांनी राजीनामे दिले रितसर खटले कोणावरच भरले गेले नाहीत. भ्रष्ट मंत्र्यांनी कशाप्रकारे सत्तेचा दुरुपयोग केला त्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यापैकी काही उदाहरणांचा येथे विचार केला आहे.

१) चुरहाट लॉटरी प्रकरण- १९८२,
२) सेंट किट्स प्रकरण- १९८९
३) बोफोर्स गैरव्यवहार - १९८७,
४) जे.एम.एम. लाचखोरी प्रकरण- १९९३
५) हवाला गैरव्यवहार - १९९३,
६) बिहार मधील चारा घोटाळा- १९९६
७) सुखराम यांचा दूरसंचार घोटाळा-१९९६
८) बराक क्षेपणास्त्र घोटाळा-२००१
९) मधुकोडा यांचा आर्थिक गैरव्यवहार २००९
१०) टु-जी स्पेक्ट्रम गैरव्यवहार -२०१०
११) आदर्श गृहनिर्माण संस्थेतील गैरव्यवहार २०११ इत्यादी

यावरुन भ्रष्टाचाराने आपल्या राष्ट्रापुढे व समाजापूढे किती गंभीर आव्हान उभे केले आहे याची थोडीफार जाणीव होते. आपल्या देशाच्या लोकशाही व्यवस्थेला भ्रष्टाचारामुळे फार मोठा धोका उत्पन्न झाला आहे. आजच्या आणि येणाऱ्या पिढयांपूढे यामुळे संकट उभे राहीले आहे केवळ लाच देणे व घेणे यांच्या पलीकडे भ्रष्टाचार आता पोहचला आहे. त्याची व्याप्ती आता जास्त संहारक झाली आहे. ही सत्यपरिस्थिती आहे.

**भ्रष्टाचाराची कारणे :**

**अ) सामाजिक कारणे : १) मनुष्य स्वभाव :** मनुष्याच्या हाती जेंव्हा सत्ता व अधिकार येतात तेंव्हा त्याचा स्वार्थासाठी वापर करण्यात मोह त्याला स्वाभाविकपणे उत्पन्न होतो. भ्रष्टाचाराचे मुळ मनुष्य स्वभावात दडलेले आहे.

**२) सामाजिक विषमता :** भारतीय समाजात अत्यंत टोकाची सामाजिक विषमता आढळून येते सामाजिक विषमता हे भ्रष्टाचाराचे महत्वचे कारण होय. गरीब झटपट श्रीमंत बणण्यासाठी भ्रष्टाचाराचा अवलंब करतो.

**३) दारिद्र्य :** आपल्या देशात श्रीमंत - गरीब यांच्यात काधीही करून न येणारी प्रचंड दरी निर्माण झाली आहे. अशा विषमतेमूळे कनिष्ठ वर्गाला वरिष्ठ वर्गाविषयी असुया वाटू लागाते वाम मार्गाने पैसा मिळविण्याची संधी उपलब्ध होताच तिचा पूरेपूर फायदा उठवला जातो.

**ब) आर्थिक कारणे :**

**१) आर्थिक सुरक्षितता :** स्वत:चे घर चारचाकी वाहन वाढते शिक्षण शुल्क, मुलांना चांगले शिक्षण, आजारपण, दागिने, या प्रत्येक व्यक्तीला आर्थिक सुरक्षितता हवी असते आणि आर्थिक सुरक्षितता प्राप्त करण्यासाठी



Scanned by CamScanner

व्यक्ती पदाचा सत्तेचा गैरवापर करू लागतो.

**२) अपूरे वेतन :** काही क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना अपूज्या वेतनात मोठ्या जबाबदाऱ्या व धोक्यांना सामोरे जा लागते. त्यात वाढती महागाई व वाढता खर्च याला तोंड देण्यासाठी भ्रष्टाचारांचा मार्ग उपयुक्त वाटतो.

**३) वाढती लोकसंख्या :** वाढत्या लोकसंख्येमुळे बेकारांची संख्या वाढते. नोकरी मिळविण्यासाठी टिकविण्यासाठी गैरमार्गाचा आधार घेतला जातो.

**४) जाचक कर पद्धती :**

**क) राजकिय कारणे :**

**१) निवडणूका :** लोकशाही शासन व्यवस्थेचा आपण स्विकार केमला आहे. लोकशाहीचा कारभार हा खर्चिक असतो राजकिय नेते, उमेदवार निवडणुकीत मतदारावर दबाव आणणे, मतपेट्या पळविणे, मतदान केंद्रे ताब्यात घेणे, खोटी आश्वासने देणे, पैसेवाले अशा प्रकारच्या गैरमार्गाचा वापर करतात.

**२) कल्याणकारी राज्याचा वाढता व्याप :** आधुनिक राज्याचे कर्यक्षेत्र व्यापक बनले आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना निर्माण झाली आहे. त्यासाठी विविध कल्याणकारी योजना निर्माण करण्यात येत आहे. मात्र त्या राबवितांना भ्रष्ट मार्गाचा अवलंब होतांना दिसतो.

**३) निवडणूक पक्षांचा फंड :–** भारतात राजकिय पक्षांना निवडणूक जिंकण्यासाठी काळ्या पैश्याची आवश्यकता भासते निवडणूकीत पैशांच्या वाढत्या भूमिकेमुळे काळा पैसा व राजकारणी हे परस्परांशी जोडले जातात.

**ड) प्रशासकिय कारणे :**

१) नौकरशाहीचे वाढते प्राबल्ये, २) प्रशासनाचा विस्तार, ३) प्रशासकिय विलंब, ४) व्यक्तिगत अधिकाराचा गैरवापर, ५) नियमबाह्य कृती, ६) सेवकांना मिळालेली नौकरीची शाश्वती, ७) वेतनातील तफावत, ८) लालफितीचा कारभार,

**इ) इतर कारणे :**

१) कडक शिक्षेचा अभाव २) कायदयाचे अज्ञान

**भ्रष्टाचारावर उपाययोजना :–**

**अ) प्रतिबंधात्मक उपाय योजना :–**

१) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा निर्माण करावा, २) प्रशासकिय दक्षता आयोग, केंद्रीय दक्षता आयोग व राज्य दक्षता आयोग निर्माण करावा, ३) प्रशासकिय सुधारणा आयोग भ्रष्टाचार प्रतिबंध समिती, ४) लोकपाल/लोकआयुक्त पद निर्मित करावे, ५) लोकांना सशक्त करण्यावर भर दयावा, ६) सामाजिक जागृती करून लोकांचे हृदय परिवर्तन करणे

**ब) दंडात्मक उपाययोजना :–**

१) विशेष पोलिस व्यवस्था, २) विभांतर्गत दक्षता यंत्रणा, ३)कृपलानी समिती, ४) केंद्रीय सतर्कता आयोग स्थापन करावा, ५)कार्यक्षम निवडणूक आयोग,

**अन्य उपाययोजना :–**

१) भ्रष्टाचार विरोधी आंदोलन, २) माहिती अधिकाराच्या प्रभावी वापर, ३) कार्यक्षम शासन यंत्रणा, ४) जागतिक स्त्रावरची प्रतिक्रिया, ५) सी.बी.आय. ला स्वतंत्र व घटनात्मक अधिकार दयावा.

**संदर्भ :**


१) सांची प.रा. – भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मुकुंद प्रकाशन ठाणे– २००५
२) खोपडे सुरेश – लोकपाल, स्नेह प्रकाशन पूणे – २००१
३) पवार कुसुम – भ्रष्टाचार आणि लोकपाल विधेयक, अरुना प्रकाशन लातूर २०१२
४) भनगे रविंद्र पांडूरंग – समकालीन राजकिय मुद्दे, प्रशांत पब्लीकेशं जळगांव
५) गिल एस.एस. – भ्रष्टांगण – परचुरे प्रकाशन मुंबई


●●●



Scanned by CamScanner



# मानव अधिकार आणि भारतातील वर्तमान स्थिती

## Human Rights And Present Scenario in India

संपादक - डॉ. केशव फाले

अथर्व पब्लिकेशन्स

Scanned by CamScanner

अथर्व पब्लिकेशन्स्

मानव अधिकार आणि भारतातील वर्तमान स्थिती
Human Rights and Present Scenario in India

© सुरक्षित

ISBN : 978-93-85026-05-8

**प्रकाशक**
युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स्**
**धुळे** १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड,
धुळे - ४२४००१.
संपर्क ९४०५२०६२३०
**जळगाव** तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी,
जळगाव - ४२५००१.
संपर्क ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
ई-मेल atharvapublications@gmail.com
वेबसाईट www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती**
२८ फेब्रुवारी २०१५

**अक्षरजुळवणी**
अथर्व पब्लिकेशन्स्

**मुखपृष्ठ**
विशाल लोहार

**मूल्य**
₹ ७५०/-

- श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथील युजीसी पुरस्कृत 'मानव अधिकार आणि भारतातील वर्तमान स्थिती' या राष्ट्रीय चर्चासत्रातील लेखांचे संकलन.
- या पुस्तकात प्रसिद्ध झालेले लेख त्या त्या संबंधित लेखकांच्या व्यक्तिगत मतांवर आधारित आहेत. संपादक/संपादकमंडळ/प्रकाशक या मतांशी सहमत असतीलच असे नाही.



Scanned by CamScanner

८३. भारतातील मुलनिवासी आदिवासींच्या मानवाधिकारांचे उल्लंघन – एक अभ्यास ........................ ३१७
– श्री. संघरक्षीत नारायण भदरगे, वाशिम
– श्री. डि. एस. अंभोरे, वाशिम
– श्री. अशोक वाघ, वाशिम
८४. भारतातील पर्यावरण संरक्षणविषयक कायदेशीर तरतुदी ........................ ३२३
– प्रा. प्रमोद आर. तायडे, मंगरूळपीर
८५. मानवी हक्क : भारतीय राज्यघटना ........................ ३२५
– प्रा. बी. पी. गरुडे, बुलडाणा
८६. बालमजुर : समस्या, हक्क व उपाय ........................ ३२८
– प्रा. भगवंत बा. बाहेकर, पुसद
८७. बालकामगार आणि मानवी हक्क ........................ ३३१
– प्रा. घननिळ गजभिये, कारंजा (लाड)
८८. मानवी हक्काचे शिक्षण ........................ ३३५
– प्रा. उमेश एस. कुऱ्हाडे, कारंजा लाड
८९. महिलाओं की चुनौतियाँ और मानवाधिकार ........................ ३३८
– प्रा. डॉ. फिरोज एस. खान, वाशिम
९०. कन्या भ्रूण हत्या – एक विश्लेषण ........................ ३४०
– डॉ. सुनिल भा. चकवे, दारव्हा
९१. मानवाधिकार और शिक्षा ........................ ३४३
– प्रा. व्हि. बी. गावंडे, वाशिम
९२. भारतीय संविधान एवं मानवाधिकार ........................ ३४६
– प्रा. नंदकिशोर अरूळकर, बुलडाणा
९३. बालश्रम और मानवाधिकार ........................ ३४९
– डॉ. सविता व्ही. रुक्के, वाशीम
९४. ज्येष्ठ नागरिक व मानवाधिकार ........................ ३५२
– प्रा. डॉ. निता तिवारी, खडकी (चां)
९५. नारी सशक्तीकरण एवं मानवाधिकार ........................ ३५५
– प्रा. महेश प्रल्हादराव गोमासे, नेरपरसोपंत
९६. Women's Bringing Up, Its Psychological Impact and Human Rights ........................ 358
- Prof. Dr. Purushottam Deshmukh, Warud
९७. The Constitution of India and Human-Rights ........................ 361
- P. S. Athawale, Ner
९८. Human Rights and Status of Women in India ........................ 365
- Mr. Milind H. Dhale, Ghatanji
९९. Human Rights in India ........................ 368
- Prof. Suresh Namdeo Gawai, Buldana
१००. Education and Human Rights ........................ 373
- Rahul P. Ghuge, Khadki (Cha)
१०१. Women Empowerment & Human Rights ........................ 375
- Prof. B. S. Ingle, Chikhli
१०२. Child Labour And Human Rights ........................ 378
- Amol Bhaudas Meshram, Akola



Scanned by CamScanner

# भारतातील पर्यावरण संरक्षणविषयक कायदेशीर तरतुदी

**प्रा. प्रमोद आर. तायडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री.व.ना. कला व श्री अ.ना. वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर.

**प्रस्तावना**

'मानवी हक्क' या संकल्पनेचा उदय २० व्या शतकात झाला औद्योगिकीकरण, नागरीकरण, आधुनिकीकरण इत्यादी मुळे मानवी परिसर व मानवी पर्यावरण यांना धोका निर्माण होण्याची भिती मानवाला वाटू लागली. त्यातुन कालांतराने पर्यावरण संरक्षण व संवर्धन या कल्पना पूढे आल्या व त्यातुन पर्यावरण संरक्षण हक्क ही संकल्पना मान्य करण्यात आली. परिसर व पर्यावरण यात बिघाड होण्यामध्ये प्रामुख्याने औद्यागिक आणि आण्विक क्षेत्रातील वाढता कचरा, वायु व पाणी प्रदुषण यांचे वाढते प्रमाण व प्रचंड प्रमाणात होणारी जंगलतोड व त्यामुळे जंगल क्षेत्रात होणारी घट, अनेक उपयुक्त औषधी व वनस्पतींचा होणारा विनाश जमीनीची धुप त्याचबरोबर पूर, भुकंप, ज्वालामुखी यातुनच पर्यावरणाचे संतूलन ढासळते. तसेच माणसाकडुन होणारी वाघ, हरीण, रानडूक्करे, ससे यांची व त्याच बरोबर पक्ष्यांची शिकार यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. या सर्व बाबी मानवी जीवनातील व मानवी भविष्याला धोका निर्माण करतात. भ्रमण ध्वनीचा व संगणकाचा वाढता वापर मानवी आरोग्य धोक्यात आणतात. त्यात नेत्र विकार, कर्णबधिरता, कंबर व पाठदूखी, पोटाचे विकार व कर्क रोग इत्यांदीचा समावेश होतो. मानवी आरोग्यासाठी पर्यावरण प्रदुषण टाळणे गरजेचे आहे.

**भारतातील पर्यावरण सरंक्षण विषयक कायदेशीर तरतुदी**

भारतात पर्यावरणीय समस्यांना प्रतिबंध करण्यासाठी काही कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यापुर्वी पर्यावरण प्रदुषण म्हणजे यात अश्या धोकादायक पदार्थाचा समावेश होतो जे मानवाला धोका निर्माण करतात. अन्य सजीवांना, वनस्पतींना, सुक्ष्मसेंद्रीय जीवांना, मालमत्तेला किंवा पर्यावरणाला धोका निर्माण करतात. भारतीय दंडविधान अधिनियमातील भाग २६८ ते २९० कलमा नुसार सार्वजनिक उपद्रव निर्माण करणाऱ्या वस्तु, ज्या वस्तु कोणत्याही कार्यक्रमाला धोका निर्माण करतात. हानी पोचवतात, कार्यक्रमात अडथळा आणतात, सार्वजनिक अन्य कोणत्याही क्षेत्रात पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या बाबींचा किंवा वस्तुंचा समावेश पर्यावरण प्रदुषणात होतो.

वरील तरतुदी शिवाय पर्यावरर्णाचे व पर्यायाने मानवी हक्कांचे संरक्षण करणारे विविध कायदे भारत सरकारने मंजूर केले असुन ते पुढील प्रमाणे –

- **वन्यजीव सरंक्षण कायदा, १९७२ :** भारतातील विविध वन्यजीवांचे संरक्षण व्हावे म्हणून भारत सरकारने हा कायदा मंजूर केला. या कायद्यानुसार जंगलातील सर्व वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन व्हावे म्हणुन वन्यप्राणी व पक्ष्यांच्या शिकारीवर, त्यांच्या व्यापारावर बंदी घालण्याची तरतुद या कायद्यात असुन संकटग्रस्त प्राणिजाती व प्रजाती यांच्या संरक्षणासंबंधीची तरतुदी करण्यात आली आहे.
- **जल–प्रदुषण व नियंत्रण कायदा, १९७४ :** हा कायदा १९७४ साली मंजूर करण्यात आला आला. यासाठी मध्यवर्ती व राज्यस्तरीय जलप्रदुषण मंडळाची स्थापना करण्यात आली. या कायद्यांतर्गत



Scanned by CamScanner

जलप्रतिबंधक व जलप्रदूषण नियंत्रणासंबधी सल्ला देण्यात येतो.

- **वन संवर्धन कायदा,१९८०** : भारतामध्ये वन संवर्धन कायदा १९८० साली मंजूर करण्यात आला. जंगलतोडीवर नियंत्रण, जंगलाचे संरक्षण व संवर्धन या संदर्भात हा कायदा आहे.
- **वायूप्रदूषण प्रतिबंधक आणि वायूनियंत्रण कायदा, १९८१** : भारतात स्वातंत्र्योत्तर कालखंडात औद्यागिकीकरण आणि नागरीकरणाचा वेग वाढल्यामुळे प्रदूषणविषयक समस्या निर्माण झाल्या. त्यामुळे १९८१ साली हवेचे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी व हवेची गुणवत्ता राखण्यासाठी हा कायदा सरकारने मंजूर केला.
- **पर्यावरण (सरंक्षण) अधिनियम, १९८६** : पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सरकारने हा कायदा निर्माण केला असुन त्यामध्ये ज्या व्यक्ती पर्यावरण प्रदूषण करुन पर्यावरणाला धोका निर्माण करतील त्यांना ७ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा व १ लाख रुपये दंड भरावा लागेल, अशी तरतुद केली आहे.

**निष्कर्ष**

केंद्र सरकारने आणि राज्य सरकारानी वेळोवेळी पर्यावरणाचे संरक्षण व्हावे या उद्देशाने जवळपास २०० कायदे तयार केले आहेत; परंतू त्यांच्या अंमलबजावणीत ढिसाळपणा असल्याने पर्यावरणाचे संरक्षण करण्यात सरकारला म्हणावे तितके यश मिळाल्याचे दिसत नाही. चोरटया पद्धतीने वाघ, मोर, इतर पक्षी, हरणे यांची शिकार होताना दिसते. वन्य प्राण्यांना सरंक्षण देण्यात सरकारला येणाऱ्या अपयशाचे हे प्रतिक होय.

२००४ साली भारतातील नदी प्रदूषणाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांच्या पथकाने जो अहवाल प्रकाशित केला त्यामध्ये असे म्हटले गेले आहे की, भारतातील गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी, ब्रम्हपुत्रा याचबरोबर सुमारे ७२; नद्या तर महाराष्ट्रातील १६ नद्या प्रदूषणाने गुदमरल्या आहेत. या सगळयाचा मथितार्थ असा की पर्यावरण संरक्षणाचे हक्क व मानवाचा जीवन जगण्याचा हक्क हे परस्परांवर अवलंबून आहेत. या दोन्ही हक्कांचे रक्षण होणे आवश्यक आहे.

**संदर्भ**


१. कुलकर्णी पी. के., मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

२. भुसारी डॉ. निळकंठ, मानवी अधिकार – विस्तापनाच्या व पर्यावरणाच्या समस्या.

३. शिरूरकर देवेंद्र, मानवी हक्क म्हणजे काय?, मुक्तरंग प्रकाशन, लातुर.




Scanned by CamScanner

Globle Journal of applied Social, Political, Sports and Science

## SHRI PADAMPRABH DIGAMBAR JAIN ARTS COLLEGE

## ANSING DIST : WASHIM

ISSN - 2278-4349

# UGC Sponsored

## Multidisciplinary National Level Seminar

## ON

# " HUMAN RIGHTS EDUCATION "

--- Organised by ---

**Deptt. of Pol.Sci.**

**Shri.P.D.Jain Arts College, Ansing**

Scanned by CamScanner

# HUMAN RIGHTS EDUCATION

ISSN : 2278-4349

First Edition : 27/02/2015

**Editor**
**Asst.Prof. V.J. Rathod**
Head of Political Science
Shri. P.D.Jain Arts College, Ansing.
Distt. Washim

**Publisher**
Principal
Shri. P.D.Jain Arts College, Ansing. Distt. Washim

**Printers**
Mohan Offcet, Washim

***Cover Page & Type Setting***
Dahore Printers,
Washim

**Note :**

The Publisher and Editor may or may not agree with the thoughts of the writers published in this souvenir. It is the sole responsibility of the writer in case of authenficity of their paper.

© *All the rights are reserved by publisher and organizer*

*Price : 300/-*

| अ.क्र. | विषय | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 27 | महिला व मानवाधिकार | प्रा. सारिका पाचराऊत (साळकर) | 61 |
| 28 | आधुनिक भारताच्या जडणघडणीत मानवी हक्कांचे महत्व | प्रा.जी.बी.जंगले | 63 |
| 29 | नैसर्गिक हवा व मानवाधिकार | डॉ. अनंत सूर्यकार | 65 |
| 30 | आदिवासी, दलित व अल्पसंख्यांकाच्या मानवाधिकारांच्या रक्षणातील प्रमूख मुद्दे | प्रा.सौ. अर्चना ज्ञानदेवराव गव्हाळे | 67 |
| 31 | "महिला व मानवाधिकार" | प्रा. डी. बी. पवार | 70 |
| 32 | आदिवासी, दलित व अल्पसंख्याकांच्या मानवाधिकारांच्या रक्षणातील प्रमुख मुद्दे | प्रा. डॉ.उल्हास एन. राठोड | 72 |
| 33 | !! भारतातील मानवधिकारांची अंमलबजावणी : व्यवस्था अडथळे !! | प्राध्यापक जी.एस.कुबडे | 75 |
| 34 | आदिवासी , दलित व अल्पसंख्यांकांच्या मानवाधिकारांच्या रक्षणातील प्रमुख मुद्‌दे | डॉ. आनंदा भिकुजी काळे/कु. संगिता तिहीले | 77 |
| 35 | मानवी हक्क व बालकल्याण | प्रा.तुरुकमाने एस.एन. | 79 |
| 36 | 'मानवाधिकार आणि समाजवास्तव' | डॉ.बी.ए.वाघ | 81 |
| 37 | मानवाधिकार आणि महिला | प्रा. प्रकाश वा. पानतावणे | 83 |
| 38 | मानवी हक्क आणि स्त्रिया | सहा. प्रा. एस. एन. शिंदे | 85 |
| 39 | बालक मानवाधिकार : वास्तविकता | सहा.प्रा.दिपक राघोजी दामोदर | 87 |
| 40 | मानव अधिकार व आदिवासी विकासासाठीच्या उपाय योजना. | प्रा. महादेव आसाराम रिठे | 90 |
| 41 | मानवी हक्क व महिला विकास | कु. वैशाली तुकाराम गोरे | 93 |
| 42 | भारतीय न्यायव्यवस्था आणि मानवाधिकार | प्रा. अविनाश मा. फाळके | 95 |
| 43 | आंबेडकरी साहित्यात मानवाधिकाराचे आविष्करण | डॉ. आर.पी. इंगळे | 98 |
| 44 | महिलांचे कौटुंबिक व विवाहविषयक हक्क | प्रा.डॉ.स्वप्ना एस. देशमुख | 101 |
| 45 | अल्पसंख्यांकांच्या मानवी हक्क रक्षणासाठी घटनात्मक तरतुदी आणि वास्तव | प्रा.प्रमोद आर.तायडे | 104 |
| 46 | मानव अधिकार आणि आत्माराम कनीराम राठोड यांची कविता | डॉ. विजय एम. जाधव | 106 |
| 47 | बालकांचे हक्क व मानवाधिकार | प्रा. मजित अ. पठाण | 109 |
| 48 | आदिवासी कुमारीमाता व मानवाधिकार | प्रा. अशोक एस. राठोड, | 111 |
| 49 | मानवी हक्क, आव्हाने आणि अंलबजावणी विशयक यंत्रणा | डॉ. व्ही. एस. इंगळे | 113 |
| 50 | भारतातील मानवाधिकारांची अंमलबजावणी: अडचणी व उपाय. | डॉ.आर.डी.इंगोले | 117 |
| 51 | मानवाधिकाराच्यां परिप्रेक्षात भारतीय महिला | प्रा श्रीहरी रंगनाथराव पितळे | 119 |




Scanned by CamScanner

# अल्पसंख्यांकांच्या मानवी हक्क रक्षणासाठी घटनात्मक तरतुदी आणि वास्तव

**प्रा.प्रमोद आर.तायडे**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

श्री व.ना.कला व श्री.अ.ना.वाणिज्य

महाविद्यालय मंगरुळपीर, जि.वाशीम

**प्रस्तावना :**

मानवी हक्क या संकल्पनेचा उदय २० व्या शतकात सुमारे सहा दक्षलक्ष ज्यु ची जी निर्घृण हत्या झाली त्यात सापडतो. त्यानंतर संयुक्त राष्ट्र संघाने १० डिसेंबर, १९४८ साली आयोजित केलेल्या अधिवेशनात मानवी हक्कांचा सार्वभौमिक जाहीरनामा प्रसिध्द करुन मानवी हक्कांचे संरक्षण, जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने एक पाऊल टाकले.

मानवी हक्क ही एक गतिशिल संकल्पना असून प्रत्येक राष्ट्र आणि राष्ट्रातील जनता त्यांच्या गरजानुसार या कल्पनेचा स्विकार करण्याचा प्रयत्न करतात मानवी हक्कांचा उल्लेख काही वेळेला पायाभूत हक्क, मुलभूत हक्क, नैसर्गिक हक्क आणि स्वाभावीक हक्क या सज्ञांनी देखील केला जातो. मानवी व्यक्तीमत्व आणि त्याचे मूलभूत हक्क यांचे सर्व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार संरक्षण करण ही संबंधीत सरकारांची अंतिम जबाबदारी होय.

**अल्पसंख्यांकासाठी घटनात्मक तरतुदी :**

अल्पसंख्यांक ही संकल्पना सापेक्ष आहे स्थळ, काळ, परिस्थिती नुरुप अल्पसख्यांक गटांचे स्वरुप वेगवेगळे असते. भारतात दोन प्रकारच्या अल्पसंख्यांकांचा उल्लेख केला जातो. एक म्हणजे भाषिक अल्पसंख्यांक व दुसरा म्हणजे धार्मिक अल्पसंख्यांक

भारतीय राज्यघटनेने सर्व भारतीय नागरिकांना समान हक्कांची खात्री प्रदान केली आहे. घटनेतील कलम १५ नुसार धर्म, वंश, आणि



Scanned by CamScanner

जात यावर आधारित विभेदीकरण नाकारले आहे. सर्व अल्पसंख्यांकांना (ख्रिश्चन, मुस्लिम, पारशी, शीख, बौध्द, जैन) स्वातंत्र्याचा हक्क, धार्मिक व्यवसाय, धार्मिक प्रथा व धर्म प्रसाराचा हक्क भारतीय घटनेने प्रदान केला आहे. धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांना त्यांच्या इच्छेनुसार शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व प्रशासित करण्याचा हक्कही संविधानाने दिला आहे.

अल्पसंख्यांकांना शैक्षणिक संस्था स्थापन केल्या तर त्याद्वारे ते त्यांचा धर्म, त्यांची भाषा, त्याची संस्कृती यांचे संवर्धन व संरक्षण करु शकतील असा हेतू यामागे आहे. त्याचप्रमाणे या शाळा विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतूनही शिक्षण देऊ शकतील. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३०(२) अनुसार संघराज्याने शिक्षण संस्थांना अनुदान देतांना अल्पसंख्यांक व बहुसंख्यांक असा भेद न करता सर्वांना समान तत्वानुसार अनुदान प्रदान करावे, असे म्हटले आहे. भारतीय राज्यघटनेने सर्व अल्पसंख्यांकांचे हक्क, त्यांची लिपी व संस्कृती यांच्या संरक्षणाची खात्री दिली आहे.

अल्पसंख्यांकांच्या सर्व प्रकारच्या हक्कांचे जतन व्हावे म्हणून भारत सरकारने १२जानेवारी, १९७८ रोजी अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना केली. त्यानुसार भारतातील अनेक घटक राज्यानी त्यांच्या त्यांच्या राज्यात अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना केली.

**राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग :-(National Commission For Minerities) :-**

नागरी आणि राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय कराराच्या कलम २७ नुसार फक्त तीन प्रकारच्या अल्पसंख्यांक गटाचा उल्लेख जागतीक पातळीवर करण्यात आला आहे.

अ) वांशिक अल्पसंख्यांक, ब) धार्मिक अल्पसंख्यांक, क) भाषिक अल्पसंख्यांक विविध हक्कांचे जतन करणे त्या राष्ट्रांची जबाबदारी मानली जाते. व त्यासाठी संयूक्त राष्ट्राच्या सभासद राष्ट्रांनी त्याच्या राज्यातील अल्पसंख्यांक नागरिकांच्या हक्कांचे जतन होते की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना करण्याचा सल्ला संयुक्त राष्ट्राने दिला होता. त्यानुसार भारत सरकाने १९७८ साली अल्पसंख्यांकासाठी एक स्वतंत्र आयोग राष्ट्रीय पातळीवर स्थापन करण्याचा आदेश काढला हा आयोग राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग या नावाने ओळखला जाईल परंतू या आयोगाला वैधानिक दर्जा मात्र १९९२ साली म्हणजे तब्बल १४ वर्षांनी प्रदान करण्यात आला.

**अल्पसंख्यांकासाठीच्या राष्ट्रीय आयोगाची कार्ये आणि वास्तव :**

अ) घटनात्मक तरतुदींचे योग्य पालन होते की नाही हे पाहणे. तसे होत नसल्यास त्यासंबंधी वार्षिक अहवाल व शिफारशी सरकारला सादर करणे.

ब) अल्पसंख्यांकांच्या अहवालाचे मुल्यमापन करणे.

क) अल्पसंख्यांकाच्या हक्कांचे उल्लंघन झाले आहे अशा विशिष्ट स्वरुपाच्या तक्रारी आल्यास त्यांचा तपास आयोगाने करावा.

यासाठी या आयेगाला दिवाणी न्यायाधीशांच्या समकक्ष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या कार्यकक्षेत सर्व प्रकारच्या मानवी हक्कभंग प्रकरणांचा तपास करण्याची क्रिया अंतर्भूत आहे. त्यामुळे मागासवर्गीयांठीच्या राष्ट्रीय आयोगाचे महत्व कमी झाल्याचे काही तज्ञ मानतात.

या आयोगाच्या कार्यक्षमतेबद्दल शंका घेतली जाते. या आयोगाने दरवर्षी संयुक्त राष्ट्र संघाला कार्याचा वार्षिक अहवाल सादर करावयाचा असतो. हा अहवाल अत्यंत उशिरा पाठविल्याचे तज्ञांच्या निरिक्षणास आले आहे. याबाबतच्या नोंदी खालीलप्रमाणे

अ) १९८० च्या अखेरीस पाठवावयाचा अल्पसंख्यांक संबंधीचा पहीला अहवाल तब्बल तीन वर्षे उशिरा म्हणजे जुलै १९८३ रोजी पाठविण्यात आला. अल्पसंख्यांक आयोगाने पाठवावयाचा दुसरा अहवाल हा १९८५ च्या अखेरीस पाठविणे अपेक्षित होता. प्रत्यक्षात मात्र हा अहवाल आयोगाने १२ जुलै, १९८९ रोजी म्हणजे ४ वर्षे उशिरा पाठविला होता.

ब) अल्पसंख्यांक आयोगाने पाठवावयाचा तिसरा अहवाल ३१ मार्च १९९२ रोजी पाठविणे अपेक्षित होते परंतू प्रत्यक्षात हा अहवाल १९ नोव्हेंबर १९९५ रोजी पाठविला.

क) या आयागाने पाठवावयाचा चौथा अहवाल ३१ मार्च २००१ ला पाठविणे अपेक्षित होते परंतू प्रत्यक्षात २००३ च्या अखरीपर्यंत हा अहवाल पाठविण्यातच आला नव्हता.

या वरुन या आयोगाचा कारभार कसा ढिला होता हे आपल्या लक्षात येईल.



Scanned by CamScanner

**निष्कर्ष :**

समाजात ज्यांना दुर्बल गट म्हणून संबोधले जाते त्या दलित, आदिवासी, आणि अल्पसंख्यांक यांना घटनेने जरी समानतेचे हक्क दि असले तरी वास्तविक जीवनात त्यांना ते उपभोगता येत नाही. दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक गट यांना आजही विषमतेची, भेदभावाचे कनिष्ठत्वाची वागणूक देऊन सामाजिक न्याय नाकारला जातो. दलितांवर आदिवासींवर व अल्पसंख्यांक जमातीवर होणारे हल्ले हे विषमतेचे प्रतीक आहे.

या सर्व विवेचनवरुन असे म्हणता येईल की मानवी हक्क सार्वभौमिक जाहिरनाम्याद्वारे जगातील नागरिकांना व भारतीय संविधानाद्वारे भारतीय नागरिकांना अनेक हक्क प्रदान करण्यात आले असले तरी प्रत्यक्षात त्या हक्कावर आधारित सामाजिक न्याय मात्र संबंधीत नागरिकांना नाकारला जातो ही वास्तवता आहे.

**संदर्भ सूची :**


१) कुळकर्णी पी.के. मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन पूणे.

२) गवई सुभाष भारतीय संविधानात्मक तरतूदी आणि वास्तव साईनाथ प्रकाशन, नागपूर

३) शिरुरकर देवेंद्र मानवी हक्क म्हणजे काय ? - मुक्तरंग प्रकाशन लातूर

४) पंडीत विवेक मानवी अधिकारांची संकल्पना


□□□□□

Scanned by CamScanner